# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती

## अहवाल

## “शिवस्वराज्य दिन २०२२”

०६ जून १६७४ रोजी छत्रपती श्री शिवाजी महाराजांचा रायगडावर राज्याभिषेक झाला होता. या महापुरुषाच्या लोककल्याणकारी स्वराज्यातील महत्वाचा दिवस म्हणजेच शिवस्वराज्याभिषेक दिन होय. हा दिवस स्वराज्याची सार्वभौमत्वाचे, स्वातंत्र्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. अश्या या दिनाचे महत्व आणखी धृढ होण्यासाठी ०६ जून हा दिवस "**शिवस्वराज्य दिन**" म्हणून साजरा केला जातो.

त्या अनुषंगाने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती मध्ये शिवस्वराज्य दिन साजरा करण्याच्या हेतूने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्या अंतर्गत अणुविद्युत व दूरसंदेशवहन विभाग मध्ये "छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांची माहितीपर छायाचित्र व लघुपट प्रदर्शनीचे" आयोजन करण्यात आले. सदर प्रदर्शनीचे आयोजन विभागातील ET - १० या वर्गखोलीत करण्यात आले.

अतिथी श्री अविनाशजी कोठले, मा. प्राचार्य, डॉ. जी. ए. ढोमणे, डॉ. डी. व्ही. रोजतकर, प्रा.आर.व्ही. मांटे, प्रा. ए. एम. मोकादम यांच्या उपस्तिथीत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या अंतर्गत विद्यार्थ्यांनी तयार केलेले लघुपट प्रदर्शित करून मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

या कार्यक्रमाला संस्थेतील एकूण १८४ विद्यार्थ्यांनी आपली उपस्थिती नोंदविली.

सदर कार्यक्रमाचे आयोजन अणुविद्युत व दूरसंदेशवहन विभागातील प्रा. एन. जी. परदेशी व प्रा. आर. आर. हरणे यांनी यशस्वीरीत्या केले.

1) प्रा. एन. जी. परदेशी 2) प्रा. आर. आर. हरणे
(प्रभारी प्राध्यापक)
अणुविद्युत व दूरसंदेशवहन विभाग

**प्रति,**
**मा. प्राचार्य**
**शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,**
**अमरावती**








छत्रपती श्री शिवाजी
गड किल्ल्यांचे







